# -: मातृप्रेमाचे महामंगल स्तोत्र :-

('श्यामची आई' हे पू. साने गुरुजींचे पुस्तक महाराष्ट्रात घरोघरी वाचले जाते. ह्या पुस्तकाचे वाचन करणे वा करवून घेणे हा एक सांस्कृतिक भाग झाला आहे. देवादिकांची स्तोत्रे आपण म्हणतो, आपल्या मुलांमुलींकडून म्हणवून घेतो, त्याचप्रमाणे साने गुरुजींनी लिहिलेले 'मातृप्रेमाचे स्तोत्र' घरोघर वाचले जाते. या पुस्तकाचे आचार्य अत्रे यांनी उत्कृष्ट रसग्रहण लिहिले. ते येथे दिले आहे.)

जगामध्ये आजपर्यंत अनेक कवींनी आणि लेखकांनी 'आई' संबंधी लिहिलेले असेल, कविता केल्या असतील, गोष्टी लिहिल्या असतील. पण मराठी भाषेत साने गुरुजींनी 'श्यामच्या आई' मध्ये मातृप्रेमाचे जे महान स्तोत्र रचून ठेवले आहे, असे अतीव माधुर्याने आणि मांगल्याने ओथंबलेले महाकाव्य दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयात असेल, असे मला मुळीच वाटत नाही. अमृताशी पैजा जिंकण्याचे सामर्थ्य आपल्या मराठी भाषेत आहे असे ज्ञानेश्वर म्हणाले; पण वाटेल त्यांच्या मुखातून किंवा लेखणीतून निघालेली मराठी भाषा अमृताशी थोडीच पैजा जिंकू शकणार आहे? ते सामर्थ्य जसे ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' मध्ये आहे, तसे गुरुजींच्या 'श्यामच्या आई' मध्ये आहे. ह्या दोन्हीही काव्यांत शुद्ध आणि निर्मळ प्रेम अगदी तुडुंब भरून वाहत आहे. अमृतदेखील अळणी पडेल, अशी नितांत मधुर स्थळे ठिकठिकाणी या काव्यात अगदी हारोहारीने लागून राहिली आहेत. द्राक्षांचे घडच्या घड नुसते लोंबाताहेत चहूकडे. त्यातले किती तोडावेत अन् किती चाखावेत? अगदी वेड लागायची पाळी येते खरोखर! ज्ञानेश्वरीप्रमाणेच 'श्यामची आई' हे मराठी भाषेचे एक अमर भूषण आहे, ह्यात काही शंका नाही. स्फूर्तीच्या, प्रसादाच्या आणि तन्मयतेच्या एका दिव्य अवस्थेतच अशा तऱ्हेचे अलौकिक लेखन संभवते. पुन्हा पुन्हा अशा अद्भुत कृती निर्माण होत नाहीत. मातेचे प्रेम हे सर्व प्रेमांत थोर आहे. ममतेची ती गंगोत्रीच आहे, म्हणानात. बाकीच्या सर्व प्रेमांचा उगम मातृप्रेमातूनच होतो. तथापि, निव्वळ मातृप्रेमाचा गौरव इतक्या विस्ताराने आणि आळवून क्वचित एखाद्या लेखकाने केला असेल.पाश्चात्य वाङ्मयात स्त्रीच्या प्रणयाचा फार गवगवा झालेला आहे. तथापि आईचे प्रेम हा केवळ हिंदू संस्कृतीचा वारसा आहे. देवाला माऊली म्हणायचे, धर्मग्रंथाला आई म्हणायचे, देशाला माता म्हणावयाचे, ही फक्त

आपल्या संस्कृतीचीच शिकवण आहे. ह्या प्रेममयी, त्यागमय आणि सनातन संस्कृतीचे स्तन्य साने गुरुजींच्या आईनेच त्यांच्या मुखात घालून त्यांना वाढविले. जगात पुष्कळ मुलांचे आपल्या आयांवर प्रेम असेल.आईवर कोणाचे प्रेम असत नाही? पण साने गुरुजींनी आपल्या आईवर जसे प्रेम केले, तसे मात्र कोणत्याही मुलाने आपल्या आईवर केले असेल असे वाटत नाही. ही मायलेकरांची जोडी म्हणजे अगदी एखाद्या पुराणातल्या गोष्टीसारखी अद्‌भुत वाटते. गुरुजींनी एवढे प्रेम करावे, अशाच योग्यतेची त्यांची आई होती. त्याखेरीज का गुरुजी एवढे मोठे झाले? गुरुजींना त्यांच्या आईने मोठे केले, तर गुरुजींनीही आपल्या आईला मोठे करून तिचे ऋण फेडले. एवढे मोठे केले, की ती आता केवळ गुरुजींची आई राहिलेली नाही. महाराष्ट्रातल्या, नव्हे भारतातल्या सर्व मुलांची ती आई झालेली आहे. आणि चैतन्याचा जो मधुर पान्हा तिने गुरुजींच्या मुखात ओतला, तो या देशातील लक्षावधी लोकांना अनंत काळपर्यंत आपल्या हृदयाशी धरून ती यापुढे पाजल्याखेरीज राहणार नाही.

काही लेखक रक्ताची शाई करून लिहितात; पण साने गुरुजींनी 'श्यामची आई' हे पुस्तक आपल्या आसवांनी लिहून काढले. त्यातले प्रत्येक अक्षरन् अक्षर गुरुजींनी गहिवरलेल्या अंत:करणाने आणि डबडबलेल्या डोळ्यांनी लिहिलेले आहे. त्यातले प्रत्येक वाक्यन् वाक्य दाटून आलेल्या गळ्यातून अन् दाबून ठेवलेल्या हुंदक्यातून निर्माण झालेले आहे, त्यामुळे कोरड्या डोळ्यांनी आणि कोरड्या हृदयाने हे पुस्तक वाचणे अगदी अशक्य आहे. कोणत्याही पानावरचे कुठलेली वाक्य काढले तरी टचकन् डोळ्यांत पाणी येते. नाशिकच्या तुरुंगात असताना दिवसा काम करावे आणि रात्री जगन्माता, भारतमाता व जन्मदात्री माता ह्यांच्या विचारांत रंगून जावे. मनात मातृप्रेमाचा असा त्रिवेणी संगम होत असताना त्या तीर्थामधून 'श्यामच्या आई' चा अकस्मात उगम झाला. आभाळातून धबाधबा गंगा खाली पडावी, तशी गुरुजींच्या लेखणीतून धो धो धो सरस्वती नुसती वाहत होती. अवघ्या पाच दिवसांत त्यांनी हे पुस्तक लिहून काढले. गुरुजींच्या सवंगड्यांनी त्यांना विचारले, ''गुरुजी! तुमच्या जीवनात हा कस्तूरीचा सुगंध कोठून आला? तुमच्यामध्ये ही सेवावृत्ती आणि ही निरहंकारिता कशी निर्माण झाली?'' गुरुजी अश्रुपूर्ण नेत्रांनी म्हणाले, ''गड्यांनो, हे सारे माझ्या आईचे देणे आहे बरे. आई माझा गुरू आणि आईच माझा कल्पतरू. गाईगुरांवर, फुलापाखरांवर,

झाडामाडावर प्रेम करायला तिने मला शिकविले. कोंड्याचा मांडा करून कसा खावा अन् अगदी गरिबीतही आपले स्वत्व व सत्त्व न गमाविता कसे राहावे, हे तिनेच मला शिकविले. थांबा, मी माझ्या आईच्या गुणांचे गाणे तुम्हांला म्हणूनच दाखवितो!'' पाण्याच्या रूपेरी धारा कारंज्यातून जशा एकदम वर उसळाव्यात, तसे गुरुजींच्या अंत:करणात जन्मापासून हेलावत असलेले मातेचे प्रेम गोष्टींच्या रूपाने एकदम त्यांच्या मुखातून उसळून बाहेर पडले. गाणाऱ्याचे ओठ जसे पवित्र झाले, तसे ऐकणाऱ्यांचे कानही कृतार्थ झाले. आपल्या मुलांचे संगोपन कसे करावे, ही कला गुरुजींच्या आईला फार चांगली माहीत होती. एकत्रित नि बालबोध घराण्यातील शुद्ध आणि सुंदर परंपरा तिच्या ठायी एकत्रित झाल्या होत्या. सूर्यचंद्राच्या किरणांनी जशी कमले फुलतात, तशा आईबापांच्या कृत्यांनी मुलांच्या जीवनकळ्या फुलतात; हे तिला माहीत होते. गुरुजींच्या जीवनाचा झरा शक्य तितका निर्मळ ठेवण्याची आटोकाट काळजी तिने घेतली. अश्रूंचा गुरुमंत्र तिनेच गुरुजींना दिला. शरीर अन् कपडे, फार झाले, तर साबणाने स्वच्छ होतील; पण मन कशाने स्वच्छ करता येईल? अश्रूंनी. म्हणून अश्रूंचे हौद परमेश्वराने डोळ्यांजवळ भरून ठेवले आहेत, पण आपले मन निर्मळ नाही, म्हणून रडणारे भाग्यवान ह्या जगात कितीसे आहेत? 'असुवन जल सींच सींच प्रेमवेलि बाई!' हा अश्रूंच्या पाण्याने मन शुद्ध करून त्यांच्यात प्रेमाची आणि भक्तीची वेल वाढवण्याचा मीराबाईचा मंत्र गुरुजींना त्यांच्या आईनेच शिकविला. अश्रूंनी तुडुंब भरलेल्या हृदयातच भक्तीची कमळे फुलतात. आपल्या जीवनवेलीला आत्मशुद्धीच्या आसवांचे शिंपण घालावयाला आईने गुरुजींना लहानपणापासून शिकविले. म्हणूनच त्या वेलीवर देशभक्तीची आणि ईश्वरभक्तीची चंद्रसूर्यांसारखी दोन तेजस्वी फुले पुढे मोठेपणी उमलली.

गुरुजींच्या जीवनात आचारांचे आणि विचारांचे सौंदर्य त्यांच्या आईनेच निर्माण केले. हळुवार भावनांचे मनोहर काव्य त्यांच्या आईनेच त्यांच्या हृदयात ओतले. फुलांचे वेड गुरुजींनी आपल्या वडिलांपासून घेतले; पण फुलावर प्रेम करावयाला गुरुजींना त्यांच्या आईनेच शिकविले. फुलांच्या कळ्या झाडावरून तोडू नयेत, फुलांना झाडावर नीट फुलू द्यावे. झाडे म्हणजे फुलांच्या माता. मुक्या कळ्यांना जीवनरस पाजून झाडे त्यांना फुलवितात. फुले फुलली, म्हणजे मग ती देवासाठी तोडावीत. मुक्या कळ्या तोडल्या, म्हणजे झाडांना अतिशय वाईट वाटते.

अशा कितीतरी काव्यमय शिकवणी गुरुजींना त्यांच्या आईने दिल्या. निसर्गावर प्रेम करावयाची दीक्षा देखील गुरुजींना त्यांच्या आईनेच दिली. रात्र झाली, अंधार पडला अन् आभाळात नक्षत्रे चमकू लागली, म्हणजे ती नक्षत्रे परमेश्वराचे, संतांचे किंवा सतीचे अश्रू आहेत, असे गुरुजींना वाटे. मोटारीने प्रवास करण्यापेक्षा बैलगाडीने प्रवास करण्यात अधिक काव्य आहे, असे गुरुजींना वाटे. ते म्हणत,''मोटारीने धावपळ करीत जाण्यात आपण सृष्टीशी एकरूप होत नाही. सृष्टिमाईजवळ क्षणभर उभे राहावे व जावे. त्यात काय आनंद! निसर्ग ही आपली माता, त्या मातेला भरभर पाहण्यात काय अर्थ! आईच्या मांडीवर लोळावे. तिच्याजवळ घटका घटका बसावे. ह्या सुखाचे काय वर्णन करावे? बैलगाड्यांच्या प्रवासात ही सारी मौज अनुभवायला मिळते. झाडामधून वरचे तारे व चंद्र सारखे डोकावत असतात.'' आई आणि बालक ह्यांची भेट झाली, म्हणजे दोघेही एकमेकांना विसरून जसे एकरूप होतात, तसे आपण सृष्टीशी तन्मय झाले पाहिजे, असे गुरुजींना वाटे. ते म्हणत,''भव्य सृष्टिदर्शन झाले म्हणजे वाटते, कुठे जाऊच नये, इथेच बसावे व सृष्टीत मिळून जावे. सृष्टीच्या महान संगीतसिंधूत आपल्या जीवनाचा बिंदू मिळवून टाकावा!'' हे प्रेमाच्या अद्वैताचे तत्त्वज्ञान गुरुजींना त्यांच्या आईने समजावून सांगितले. सृष्टीचे अंतिम स्वरूप प्रेम आहे युद्ध नाही, हा बोध गुरुजींना मातेच्या अंतःकरणामधून झाला. ते म्हणत,''दरोडेखोर खून अन् चोऱ्या करायला का प्रवृत्त होतात? त्या क्रूर कर्माच्या मुळाशीही दयाच आहे ना? स्वतःची मुलेबाळे जगावीत, त्यांची उपासमार होऊ नये, ही प्रेमभावनाच त्याच्या तळाशी आहे ना?'' निःस्वार्थी सेवेचे अन् आत्मार्पणाचे धडेही गुरुजींना आईनेच दिले. त्यांची आई म्हणे,''अरे, जवळ जे असेल, ते दुसऱ्यास द्यावे. दुसऱ्याचे अश्रू थांबवावे. त्याला हसवावे आणि सुखवावे. ह्या आनंदासारखा आनंद नाही.'' जगाला सुधारून सुखी करावयाचे गुरुजींच्या आईजवळ इतके सोपे आणि साधे तत्त्वज्ञान होते; ''उगीच खोलात कशाला शिरावयाचे? आपल्याला करता येईल, ते करावे. दगड उचलावा. काटा फेकावा. फुलझाड लावावे. रस्ता झाडावा. कोणाजवळही गोड बोलावे. आजाऱ्याजवळ बसावे. रडणाऱ्याचे अश्रू पुसावेत. अरे, दोन दिवस तर जगात राहावयाचे आहे!'' मनुष्य अन्नावाचून जगेल; पण प्रेमावाचून जगणार नाही. ही गुरुजींच्या हृदयातली प्रेमाची भूक त्यांच्या आईने उत्पन्न केली. प्रेम हे जीवनाचे जीवन आहे. हे तत्त्वज्ञान ते काय साधुसंतांपासून शिकले म्हणता की काय? छे! आईपासून. गुरुजींच्या ह्या प्रेमाची तऱ्हाही पण निराळीच होती. ते म्हणत,''प्रेम घेण्यापेक्षा प्रेम देण्यात परम

आनंद आहे. लहान अंकुराला जर प्रेमाने वाढविले तर तो मोठा होतो आणि हजारोंना प्रेम देतो. ज्यांना बाळपणी प्रेम मिळाले नाही त्यांना जगास प्रेम देता येत नाही. ते जीवनात कठोर होतात.'' प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे, अन् जगाला सुखी करून सोडावे, ही प्रेमाची धुळाक्षरे गुरुजी आपल्या आईच्या भोवती रांगता रांगता अन् खेळताखेळताच लहानपणी शिकले.

ह्या माय लेकरांच्या प्रेमाच्या कितीतरी गोड गोड आणि हृदयस्पर्शी गोष्टी 'श्यामच्या आई' मध्ये आहेत! लहानपणी एकदा गुरुजींना त्यांच्या आईने आंघोळ घातली अन् आपल्या लुगड्यानेच त्यांचे अंग पुसले. आई त्यांना म्हणाली,''जा, देवाची फुले काढ.'' गुरुजी म्हणाले,''माझे तळवे ओले आहेत. त्यांना माती लागेल. तुझे ओचे खाली पसर. त्यावर मी माझे पाय पुसतो.'' गुरुजी लहानपणी भारी हट्टी होते. म्हणून आई त्यांच्याशी अधिक बोलण्याच्या भरीस पडली नाही. तिने आपले ओचे खाली पसरले. गुरुजींनी त्यावर उडी मारून आपले पाय पुसले. गुरुजींच्या पायाला माती लागू नये, त्याची हौस पुरवावी, म्हणून आईने आपले लुगडे ओले करून घेतले. आई आपल्या मुलासाठी काय करणार नाही? काय सोसणार नाही? गुरुजी देवघरात गेले, तेव्हा आई म्हणाली,''बाळ, पायाला घाण लागू नये, म्हणून तू जसा जपतोस, तसाच मनाला घाण लागू नये, म्हणून जप हो. देवाला सांग, शुद्ध बुद्धी दे, म्हणून.'' आईच्या प्रेमाची इतकी कोमल कथा कोणत्या वाङ्मयात वाचायला मिळेल बरे? एकदा एका झाडावरून पक्ष्याचे पिलू खाली पडले आणि अर्धमेले झाले. गुरुजींनी त्याला जगविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्याचा काही एक उपयोग झाला नाही. काही वेळाने ते चोच वासून मरुन पडले. शेवंतीच्या आणि मोगऱ्याच्या वाफ्यामध्ये गुरुजींनी त्याला रडत रडत पुरले अन् मांजराने उकरू नये, म्हणून त्याजवर एक सुंदरसा दगड ठेवला. नंतर घरात जाऊन ते एका कोपऱ्यात बसले. आईने विचारले,''कारे, बाजूला का बसलास?'' गुरुजी म्हणाले,''मला त्या पाखराचे सुतक आहे.'' आई हसून म्हणाली., ''हातपाय धुतले, म्हणजे झाले. सुतक धरण्याची जरुरी नाही. तू त्याला प्रेम दिलेस, चांगले केलेस. देवही आता तुझ्यावर प्रेम करील. देवाच्या लेकरांस कीड, मुंगी, पशुपक्षी ह्यांना जे द्याल, ते शतपटीने वाढवून देवबाप्पा तुम्हांला परत करतो. तू या पाखरावर प्रेम केलेस. तसे आपल्या भावंडांवर प्रेम कर. तुमची एकच बहीण आहे. तिला अंतर देऊ नकोस.'' ही गोष्ट वाचून कोणाचे अंतःकरण सद्गदित होणार नाही? दापोलीच्या इंग्रजी शाळेत लहानपणी गुरुजी शिकत होते. तेव्हा त्यांनी डोक्यावर

केस राखले. एका सुट्टीच्या दिवशी ते घरी आले, तेव्हा त्यांच्या डोक्यावर केस पाहून त्यांचे वडील रागावले. ते म्हणाले,''न्हावी मिळत नाही का रे, तिकडे? नुसता कावळा दिसतो आहेस. उद्या हजामत करून टाक.'' गुरुजी रडू लागले. प्रेमाचे भुकेले होते. पण वडिलांकडून त्यांना दगड मिळाले. रात्री आई म्हणाली,''ते बोलले, म्हणून एवढे काही त्यांच्यावर रागावू नकोस. आजपर्यंत तुमच्यासाठी एवढ्या खस्ता त्यांनी खाल्ल्या. त्यांच्या धर्मभावना दुखावल्या जाऊ नये, म्हणून तू इतकेही पण करू नयेस!'' गुरुजी म्हणाले,''केसांत, ग, कसला आहे धर्म?'' आई म्हणाली,'केस तू का ठेवतोस? मोह म्हणूनच ना? मग मोह सोडणे म्हणजेच धर्म!'' धर्माची एवढी सुंदर सोपी व्याख्या एखाद्या धर्म संस्थापकाला तरी सुचणे शक्य आहे काय? घरातल्या प्रत्येक कामात गुरुजी आपल्या आईला मदत करीत असत. डाळ-तांदूळ निवडणे, धुणी धुणे, भांडी विसळणे ह्या सर्व गोष्टी गुरुजी आपल्या हातांनी करीत. शेजारच्या बायका गुरुजींच्या आईला हिणवून म्हणत, की तुम्ही आपल्या मुलाला अगदी बायको करून टाकले आहे. तेव्हा त्यांची आई म्हणाली,''बायकांना पुरुषांची कामे आली पाहिजेत अन् पुरुषांना बायकांची कामे आली पाहिजेत. ह्याचेच नाव लग्न. पुरुषांच्या हृदयात स्त्री गुण येणे व स्त्रीजवळ पुरुषगुण येणे म्हणजेच विवाह.'' प्रेम, दया, कष्ट नि सेवा ह्या स्त्रीगुणांशी गुरुजींच्या आईने त्यांचे लग्न लावून टाकले होते. म्हणूनच आयुष्यात निराळे लग्न लावण्याची गुरुजींना जणू काही जरुरीच पडली नाही. लाडघरच्या तामस्तीर्थाला देवीचा नवस फेडण्यासाठी गुरुजींच्या आईला एकदा जायचे होते. म्हणून एका पहाटे गुरुजी अन् त्यांची आई बैलगाडीतून निघाली. ते वर्णन गुरुजींनी इतक्यात काव्यमय भाषेत केलेले आहे, की ते त्यांच्याच शब्दांत सांगितले पाहिजे. 'पहाटेची शांत वेळ होती. कृत्तिकांचा सुंदर पुंजाकार आकाशात दिसत होता. बैलांच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या. गाडीमध्ये मी व माझी आई दोघेजणच होतो. मी व माझी आई. माझी आई व मी. दोघे- अगदी दोघेच होतो. मी आईच्या मांडीत डोके खुपसून निजलो होतो. आई माझ्या केसांमधून आपला प्रेमळ हात फिरवीत होती. काही वेळाने ती मला थोपटून ओव्या म्हणू लागली-

**घनदाट या रानात, धो धो स्वच्छ वाहे पाणी**
**माझ्या श्यामच्या जीवनी, देव राहो।**

मायलेकरांच्या प्रेमाचे इतके रोमहर्षक चित्र आजपर्यंत कोणत्या कवीने रेखाटले आहे बरे! लाडघरला पोहोचल्यावर लहानगे गुरुजी लंगोटी लावून समुद्राच्या

पाण्यात शिरले व लाटांशी खेळू लागले. त्यांच्या आईने समुद्राच्या गुडघाभर पाण्यात बुडी मारली व समुद्राची पूजा करून आपल्या कडोसरीचे चार आणे समुद्रात फेकून दिले. मोत्यांच्या राशी ज्याच्या पोटात आहेत, त्या रत्नाकराला आपल्या आईने चार आणे द्यावेत, हे पाहून गुरुजींना गंमत वाटली. पण आई म्हणाली,''बाळ, ही कृतज्ञता आहे. चंद्रसूर्य निर्माण करणाऱ्या देवाला आपण काडवातीने आणि निरांजनाने का ओवाळतो बरे? आपली भक्ती आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ना? तशी समुद्राला पाहून आपण थोडीतरी त्यागबुद्धी नको का शिकायला?'' उदात्त भावनेने ओथंबलेली अशी अनेक रत्ने 'श्यामच्या आई' मध्ये जागोजाग विखुरली आहेत. ती किती किती वेचावीत अन् किती किती मनात साठवावीत! आईच्या मृत्यूचा प्रसंग वर्णन करताना तर गुरुजींनी भवभूतीवरही ताण केली आहे. फत्तराला देखील पाझर फुटतील एवढे कारुण्य गुरुजींनी त्या वर्णनांत ओतले आहे. स्मशानात आईच्या पिंडाला जेव्हा कावळा शिवेना तेव्हा गुरुजी सद्गदित कंठाने म्हणाले,''आई, तुझी इच्छा असेल, तर मी लग्न करीन!'' कारुण्यातला हा विनोद अक्षरश: हृदय पिळवटून टाकणारा आहे. पण मातेच्या शोकामधले हे कारुण्य नुसते रडविणारे किंवा अगतिक करणारे नाही, नवीन चैतन्य आणि नवीन सामर्थ्य निर्माण करण्याची शक्ती त्या कारुण्यात आहे. गुरुजी म्हणतात,''माझी आई गेली; परंतु भारतमातेच्या सेवेसाठी मला तयार करून गेली. स्वातंत्र्ययुद्धात मातृमोहाने मी पडणार नाही, म्हणून ती कदाचित माझ्यापासून दूर गेली असेल. सर्व भारतातील माता माझ्या होवोत, एकच नव्हे, तर अनेक आया मला मिळोत, म्हणूनही ती गेली असेल. आता तिकडे जिकडे माझ्याच आया. सर्वांच्या आया, त्या माझ्या आया. ही दिव्य दृष्टी मला देण्यासाठी माझ्या आईने आपल्या झिरझिरीत देहाचा पडदा दूर करून टाकला.''मानवतेच्या अत्युच्च शिखरावर बसून एखादा महान ऋषी विश्वप्रेमाचे उदात्त उपनिषद उच्चारतो आहे, असे गुरुजींची ही दिव्य वाणी ऐकताना वाटते. लहान मुलांची अन् तरुणांची जीवने विशुद्ध आणि विशाल बनविण्याची विलक्षण संजीवनी 'श्यामच्या आई' मध्ये आहे, यात काय शंका?

**मानवी जीवनातल्या सर्व सद्गुणांची, सौंदर्याची अन् मांगल्याची जणू काही धार काढूनच ती ह्या चांदीच्या कासंडीत भरून गुरुजींनी तरुण पिढीच्या हातांत दिलेली आहे. ह्या दृष्टीने 'श्यामची आई' ही भारताच्या मुलाबाळांची अन् तरुणांची 'अमर गीताई' च आहे असे म्हटले पाहिजे.**

– आचार्य अत्रे